राष्ट्रीय स्पर्धा पूर्व प्रशिक्षण शिबिरे
आयोजनासाठी अधिकृत
राज्य संघटनांना आर्थिक सहाय्य...

# महाराष्ट्र शासन

समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक राक्रीधो. १०९६/प्र. क्र. ३३०/क्रीयुसे-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक ३१ जुलै १९९७

वाचा.-(१) शासन निर्णय क्र. पीएचई. ८५६७(८५)/क्रीयुसे-१, दिनांक १९ ऑक्टोबर १९८४.
(१) शासन निर्णय क्र. पीएचई. १०८९/१८१९२/२९९/क्रीयुसे-१, दिनांक १० नोव्हेंबर १९९०.

**प्रस्तावना :**

क्रीडा संस्कृतीची जोपासना व वाढ करण्यामध्ये विविध खेळांच्या क्रीडा संघटनांचा महत्त्वाचा वाटा आहे. या संघटनांना अधिक बळकट करण्याची आवश्यकता लक्षात घेऊन राज्याच्या क्रीडा धोरणानुसार विविध खेळांच्या राज्य संघटनांना राष्ट्रीय स्पर्धा पूर्व प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यासाठी सध्या देण्यात येणाऱ्या आर्थिक सहाय्यात वाढ करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :**

या योजनेचे संदर्भाधिन शासन निर्णय अधिक्रमित करून या शासन निर्णयाच्या परिशिष्टानुसार सुधारित नियमास शासन मान्यता देत आहे. यासाठी संचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना या योजनेची अंमलबजावणी करण्याचे व आर्थिक सहाय्य मंजुरीचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

२. या योजनेवर होणारा खर्च त्या त्या आर्थिक वर्षाच्या मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीतून भागविण्यात यावा आणि "२२०४, क्रीडा व युवकसेवा-१०४-क्रीडा व खेळ (पाच)(ए) ४१-सहाय्यक अनुदान (३) प्रशिक्षण शिबिरे संघटित करण्यासाठी राज्य संघास वित्तीय सहाय्य देणे" या लेखा शीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

हे आदेश शासन निर्णयाच्या दिनांकापासून पुढील आदेश होईपर्यंत अंमलात राहतील.

३. हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क. प्र. क्र. ७३८/व्यय-११, दिनांक २२ जुलै १९९७ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रमेशचंद्र कानडे,**
सचिव,
महाराष्ट्र शासन.

---

## परिशिष्ट

शासन निर्णय क्रमांक राक्रीधो. १०९६/प्र. क्र. ३३०/क्रीयुसे-१

दिनांक ३१ जुलै १९९७

**नियम : १--शीर्षक.**–या नियमास " राज्य संघटनांना राष्ट्रीय स्पर्धा पूर्व प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्याबाबतचे नियम " असे संबोधण्यात यावे.

**नियम : २–अंमलबजावणीचा दिनांक.**–हे नियम शासन निर्णयाच्या दिनांकापासून पुढील आदेश होईपर्यंत अंमलात राहतील.

**नियम : ३–आर्थिक सहाय्यासाठी पात्र क्रीडा प्रकार.**–खाली नमूद केलेल्या क्रीडा प्रकाराच्या अधिकृत राज्य संघटना आर्थिक सहाय्यासाठी पात्र राहतील.

**(१) अॅथलेटिक्स, (२) अॅक्वेटिक्स, (३) आर्चरी, (४)आट्यापाट्या, (५) बॅडमिंटन, (६) बास्केटबॉल, (७) बिलियर्ड्स, (८) बॉलबॅडमिंटन, (९) ब्रीज, (१०) बॉक्सिंग, (११) बॉडी बिल्डींग, (१२)क्रिकेट, (१३) सायकलिंग, (१४)कॅरम, (१५) बुद्धिबळ, (१६) फूटबॉल, (१७) फेंसिंग, (१८) जिम्नॅस्टिक्स, (१९) हॅन्डबॉल, (२०) हॉकी, (२१) ज्युदों, (२२) कराटे, (२३) कबड्डी, (२४) खो-खो, (२५) कॅनोईंग-कयाकिंग, (२६) मल्लखांब, (२७) पॉवर लिफ्टिंग, (२८) रायफल शूटींग, (२९) रींग टेनिस, (३०) सॉफ्टबॉल, (३१) शूटींग बॉल, (३२) टेबल टेनीस, (३३) टेनीस, (३४) व्हॉलीबॉल, (३५) कुस्ती, (३६) वेटलिफ्टिंग, (३७) यॉटिंग, (३८) रोलर स्केटिंग, (३९) रोईंग.**

**नियम : ४–प्रशिक्षण शिबिराचा कालावधी.**–राष्ट्रीय स्पर्धा पूर्व प्रशिक्षण शिबिराचा कालावधी किमान ७ दिवसांचा आवश्यक राहील.

**नियम : ५–खेळाडूंची संख्या.**–राष्ट्रीय स्पर्धेसाठी संबंधित खेळाच्या संघटनेने निश्चित केलेल्या खेळाडूंच्या संख्येइतकीच संख्या आर्थिक सहाय्यासाठी ग्राह्य धरण्यात यावी.

**नियम : ६–आर्थिक सहाय्याची मर्यादा.**–प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल रुपये १५,००० यापैकी जी रक्कम कमी असेल इतके आर्थिक सहाय्य देण्यात यावे. संबंधित खेळाच्या सर्व वयोगटांच्या प्रशिक्षण शिबिरासाठी स्वतंत्रपणे आर्थिक सहाय्य देण्यात यावे.

**नियम : ७–आर्थिक सहाय्यासाठी खर्चाच्या ग्राह्य बाबी.**–खाली नमूद केलेल्या खर्चाच्या बाबी आर्थिक सहाय्यासाठी ग्राह्य धरण्यात याव्यात.

(अ) खेळाडू, प्रशिक्षक यांचा निवास व भोजन खर्च प्रत्येकी प्रतिदिन रुपये ६० (साठ) पेक्षा जास्त नसेल.

(ब) खेळाडू, प्रशिक्षक यांचा प्रवास खर्च (दुसऱ्या वर्गाचे रेल्वेचे सवलतीच्या दराने भाडे किंवा राज्य परिवहन महामंडळ, प्रत्यक्ष बसभाडे).

(क) क्रीडांगणाची देखभाल/भाडे.

(ड) आवश्यक क्रीडा साहित्य.

**नियम : ८–विनियोग प्रमाणपत्र.**–मंजूर केलेल्या आर्थिक सहाय्याचे विनियोग प्रमाणपत्र, लेखापरीक्षित विवरणपत्र पुढील वर्षाच्या आर्थिक सहाय्य मागणी अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

**नियम : ९–आर्थिक सहाय्य मंजुरीचे अधिकार.**–संचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना सदर नियमांचे अधिन राहून आर्थिक सहाय्य मंजुरीचे अधिकार प्रदान करण्यात येत आहे.

**नियम : १०–आहरण व संवितरण अधिकारी.**–आहरण व संवितरण अधिकारी म्हणून जिल्हा क्रीडा अधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**नियम : ११–अर्ज करण्याची पद्धत.**–आर्थिक सहाय्य मागणीसाठी विहित केलेल्या नमुन्यात अर्ज संबंधित राज्य संघटनेने संचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांच्याकडे करणे आवश्यक आहे.

**नियम : १२–शिथिल/बदल करणे.**–वरील नियम शिथिल करणे, अंशतः किंवा संपूर्ण बदल करणे, नवीन खेळ समाविष्ट करणे किंवा वगळणे यांबाबतचे अधिकार प्रशासकीय विभागास राहतील.

---